# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास मंडळ

**: परिपत्रक क्र. ५५/२०२५ :**

या परिपत्रकाद्वारे आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५ पासून कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेच्या नियमावली व मार्गदर्शक तत्वात खालीलप्रमाणे सुधारणा आणि या योजनेसंदर्भातील जे महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले त्याबाबतची माहिती खाली नमूद करण्यात येत आहे.

१) कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेच्या मानधनात दिनांक ०१ जानेवारी, २०२४ पासून वाढ करण्यात आली आहे. महाविद्यालय/परिसंस्थेच्या एकूण नियमित विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात कमाल अनुदानात नैसर्गिकरित्या वाढ करणे आवश्यक असल्याने या मानधनात झालेल्या वाढीचा विचार करता शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५ पासून कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना राबविणाऱ्या सर्व महाविद्यालय/परिसंस्थांना अनुदान देताना महाविद्यालयाच्या एकूण नियमित विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात खालीलप्रमाणे कमाल अनुदान देय असेल.

| अ.क्र. | महाविद्यालय व परिसंस्थेतील नियमित प्रवेशित विद्यार्थी संख्या | शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून झालेली सुधारित अनुदानाची कमाल मर्यादा (मानधन रू. ५५ नुसार) |
|---|---|---|
| १. | ०००१ ते ०५०० | रू. ९१,५००/– |
| २. | ०५०१ ते १००० | रू. १,८३,०००/– |
| ३. | १००१ ते १५०० | रू. २,७४,५००/– |
| ४. | १५०१ ते २००० | रू. ३,६६,०००/– |
| ५. | २००१ ते २५०० | रू. ४,५७,५००/– |
| ६. | २५०१ ते ३००० | रू. ५,४९,०००/– |
| ७. | ३००१ ते ३५०० | रू. ६,४०,५००/– |
| ८. | ३५०१ ते ४००० | रू. ७,३२,०००/– |
| ९. | ४००१ ते ४५०० | रू. ८,२३,५००/– |
| १०. | ४५०१ ते ५००० | रू. ९,१५,०००/– |
| ११ | ५००१ ते ५५०० | रू. १०,०६,५००/– |
| १२ | ५५०१ ते ६००० | रू. १०,९८,०००/– |
| १३ | ६००१ ते ६५०० | रू. ११,८९,५००/– |
| १४ | ६५०१ ते ७००० | रू. १२,८१,०००/– |
| १५ | ७००१ ते ७५०० | रू. १३,७२,५००/– |
| १६ | ७५०१ ते ८००० | रू. १४,६४,०००/– |
| १७ | ८००१ ते ८५०० | रू. १५,५५,५००/– |
| १८ | ८५०१ ते ९००० | रू. १६,४७,०००/– |
| १९ | ९००१ ते ९५०० | रू. १७,३८,५००/– |
| २० | ९५०१ ते १०००० | रू. १८,३०,०००/– |
| २१ | १०००१ ते १०५०० | रू. १९,२१,५००/– |
| २२ | १०५०१ ते ११००० | रू. २०,१३,०००/– |
| २३ | ११००१ ते ११५०० | रू. २१,०४,५००/– |
| २४ | ११५०१ ते १२००० | रू. २१,९६,०००/– |

२) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांना अनुदान देताना महाविद्यालयाच्या एकूण नियमित विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात वरीलप्रमाणेच कमाल अनुदान देय असेल आणि **या अनुदानाच्या कमाल मर्यादेपेक्षा अतिरिक्त झालेला खर्च हा योजना राबविणाऱ्या संबंधित संलग्न व स्वायत्त महाविद्यालय/परिसंस्थेनी स्वत: करावयाचा आहे**.

३) सद्यस्थितीत 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका' या योजनेत सहभागी सर्व संलग्न व स्वायत्त महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांना देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या रक्कमेची असलेली टक्केवारी ही ९०:१० (विद्यापीठाकडून ९०% व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांकडून १०%) आहे. सद्यस्थितितील सदर ९०:१० (विद्यापीठाकडून ९०% व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांकडून १०%) हीच टक्केवारी कायम ठेवण्यात येऊन याच टक्केवारीनुसार पुढील कालावधीत अनुदान देय असेल

४) 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका' ही योजना अर्थार्जन करणारी योजना ठरावी या उद्देशाने महाविद्यालय/परिसंस्थेच्या परिसराचा, महाविद्यालय/परिसंस्थेच्या भौगोलिक परिस्थितीचा, महाविद्यालय/परिसंस्थेत असणाऱ्या स्थायी स्वरूपातील भौतिक सोयी–सुविधा यांची उपलब्धता लक्षात घेऊन व्यावसायिक महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये यांनी त्यांच्या पातळीवर इतर स्त्रोत्राच्या माध्यमातून या योजनेकरिता अर्थतरतूद उपलब्ध करण्यासंदर्भात भरघोस प्रयत्न करावेत.

५) **कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेबाबतचे नियम व मार्गदर्शक तत्त्वे हे वरील बदल वगळता पूर्वीप्रमाणेच पुढील नियमावली वा पुनर्रचना निर्धारित होईपर्यंत लागू राहतील.**

**वरील परिपत्रकाचा आशय संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.**

**विद्यार्थी विकास मंडळ**
गणेशखिंड, पुणे – ७
दिनांक : १० मार्च, २०२५
जावक क्र. :विविमं/२०२४–२५/१११५

(डॉ. अभिजीत कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

<u>प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :</u>

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्न व स्वायत्त महाविद्यालये.
२. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त परिसंस्था.